हवा म्हणजे ? समुद्रकाठी आपण खातो ती. हवेला जोर आला की त्याला वारा म्हणतात. वारा जोरात आला की त्याचे वादळ होते. काही वादळे चक्कर सारखी वागतात. त्यांना चक्री वादळ म्हणतात. वादळाचा जोर वाढला की त्याला तुफान म्हणतात. हवा, वारा, वादळ वा तुफान ह्या भासणाऱ्या गोष्टी आहेत, दिसणाऱ्या नाहींत. जे दिसतं ते त्याचे परिणाम, आपण म्हणतो खिडकीतून हवा येते. दरवाजा लाव वारा येतोय. पण येणारी हवा वा वारा कोणाला दिसला आहे ? डोळ्यांना नाहीं दिसत पण अंगाला भासतो, भासतो म्हणून असतो म्हणजे आहे असं म्हणतो व तसं मानतो. आपण असे म्हण नाही की दिसत नाही म्हणून ती नाही. तिला अस्तित्व नाही, थंडी वाजते पण ऐकू कुठे येते वा दिसते कुठे ? भांडे शांत दिसते पण हात लावला की चटका भासतो. गरमपणा दिसत नाहीं. पण हाताला भासतो. तारांतून जाणारी वीज कुठे दिसते ? दिसते ती तार तिचे माध्यम, पण हात लावा जीवंत तारेला. झणझणलाच. मग पटतं वीज आहे म्हणून. हवा काय, थंडी काय वीज काय दिसत नाहीं म्हणून नाहीच असं आपण म्हणत नाहीं. मग देवानेच असं काय पाप केलय की दिसत नाहीं म्हणून तो नाहीच म्हणावे ? देव दिसत नव्हता म्हणून हिरण्यकश्यपू तो मानीत नव्हता, कुठे आहे दाखव असं म्हणून त्याने खांबावर लाथ मारली व त्याला देव दिसला. खरं म्हणजे त्याला देव दिसला नाहीच. दिसले ते देवाचे रूप. पोट चिरले जाताना देव आठवला असेल हे निराळे. रूप तरी कोणते ? नृसिंह, मानव कम (संयोग) सिंह मानव व सिंह आणि ते तरी कुठे ? खांबात. म्हणजे मी सर्व प्राणीमात्रात, सजीवात, निर्जिवात जडात अजडात आहे असे देवाला सुचवावयाचे होते की काय न कळे. हवा, वारा, वादळ तुफान किंवा वीज, बिजली इलेक्ट्रीक सिटी ही जशी एकाच शक्तिला दिलेली नावे आहेत तशीच देव, ईश्वर, परमेश्वर, पुरुषोत्तम ही एकाच शक्तीची नावे आहेत. शक्ति कधी दिसते का ? ती अनुभवास येते. एकाद्या धटिंगणाचा धक्का लागला व आपण कोडमोडलो की म्हणतो काय रेट्याची शक्ति आहे. धटिंगण दिसतो पण त्याची शक्ति कुठे दिसते. देव ही शक्ति आहे. ती दिसत नाही. देव अदृश्य आहे. संकटकाली भासतो. आपण म्हणतोच की देवाने खैर केली म्हणून वाचलो. माणसाच्या आयुष्यात पुष्कळवेळा अशा गोष्टी घडतात की त्यावेळी त्याच्या मनाला देवाचा भास होतो. तर्कशास्त्र नाहीं म्हणू द्या. पण अनुभवशास्त्र केव्हातरी होय म्हणायला लावते. असा अदृश्य तर्क देव नाही आहे असं म्हणणं वेडेपणाचे नव्हे काय ? तसं म्हटलं तर देव आहेही व नाहीहि. समर्थांचा बेडूक तरी काय हेच सांगतो. देव गहन गुहेत काळ्यामिट्ट काळोखात आहे. मग दिसणार कसा ? काळोख जाऊ द्या. उजाडू द्या, मग दिसेल की.

## १७ मोकळ्या जागा

हल्ली परीक्षेमध्ये नवीन वर्तीचे प्रश्न येत असतात. मोकळी जागा योग्य शब्दाने भरा असा एक प्रश्न असतो. कित्येक वेळा कंसात योग्य अयोग्य शब्द देऊन त्यातून योग्य शब्दाची निवड करायला सांगतात. सत्य, असत्य, खरी खोटी विधाने एकत्र देऊन त्यातून खरं खोट निराळे करावयाचे असते. उदा. चंद्र पश्चिमेस उगवतो. खरें की खोटे? अर्थात खोटे. काही प्रश्नात योग्य जोड्या लावावयाच्या असतात. अ मधील वाक्याला ब मधील वाक्यातील जोडीदार वा समानार्थी निवडा. बुद्धिची कसोटी पहाणारे हे प्रश्न असतात. मुलांना ते सोपे वाटतात कारण एकतर त्यात फारसे लिहावे लागत नाहीं (हल्लीच्या विद्यार्थ्यांना पान सव्वा पान लिहिण्याचा कंटाळा असतो कारण त्यांना धड लिहिताच येत नाहीं. ) व दुसरे भरपूर आंबे आलेल्या झाडावर जाता येता एकादा दगड सहज भिरकावला तर एकादा आंबा पडतो तद्वत या प्रश्नांची आनमान धबक्याने उत्तरे ठोकली तर येतात एक दोन बरोबर. या रामभरोशास आळा बसावा म्हणून खरी रीत अशी बरोबर व चूक यांच्या वजाबाकी इतके गुण देणे होय ! (पण असं मात्र करीत नाहींत हे निराळे) असले प्रश्न सोडवण्यास अभ्यास पाहिजे बुद्धि पाहिजे, स्मरणशक्ति पाहिजे, निरीक्षण पाहिजे, तारतम्य भाव पाहिजे, सर्व प्रश्नात निवड करणे हे समान तत्त्व आहे. ज्या विद्यार्थ्यांना निवडण चांगले येते. (यासाठी उपाय–विद्यार्थ्यांनी अभ्यासाऐवजी रेशनमधील खडे वा अरगट निवडण्याची सवय करावी. ते हे प्रश्न सहज सोडवतात व आनंदी चेहऱ्याने हसत हसत परिक्षेच्या हॉल बाहेर येतात.

तसं पाहिलं तर हे प्रश्न काही नवीन नाहीत. फार पुराणे आहेत. मानवी जीवन सुरु झाले तेव्हापासून आपल्या जीवनात मानवाला हे प्रश्न सोडवावे लागत आहेत. प्रश्न सोडवीत सोडवीत मानवी जीवन पुढे पुढे न्यावे लागते. जीवनात पुष्कळ गोष्टींची कमतरता असते – मोकळी जागा असते. मानव जन्मास येतो तेव्हा आपल्या जीवनास आवश्यक ते सर्वकाही घेऊन जन्मास येत नाहीं. पुष्कळ पोकळ्या असतात. पैशाची जागा मोकळी असते. शिक्षण नोकरी धंदा यांनी ती भरून काढावी लागते. तरुणपणी सत्य, असत्य, योग्य अयोग्य यांची निवड करावी लागते. अ मधील तरुण व ब मधील तरुणी यांच्या योग्य जोड्या निवडाव्या लागतात, यात चूक झाली तर संसारी जीवन असह्य होण्याचा संभव असतो. समाजाच्या कंसात, व्यवहारात नाना गोष्टी असतात. त्यातून आपल्या जीवनाला योग्य कोणती ते ठरवावे लागते. यासाठी अबकड वगैरे पैकी आपल्या जीवनाला पोषक कोणती हे ओळखण्याचे ज्ञान पाहिजे. मानवी जीवन सत्य असत्य यांची भेसळ आहे. त्यामुळे सत्य असत्य यांच्यात

सारखी निवड करावी लागते. हे की ते हे जीवनात सारखं उभ असते. फार फार वर्षापूर्वी जीवन हे साधवाक्य (Simple) होते. १०० वर्षापूर्वी ते जोड वाक्य (Compound) होते पण आज ते मिश्र वाक्य (Complex) आहे. यामुळे निवड करणे फार कठीण होऊन बसले आहे. जीवनात अनमान धक्क्याने उत्तरे देणे योग्य नव्हे कारण त्यात धोका असतो. चुकीचे प्रायश्चित्त घ्यावे लागते. जीवनातल्या या परीक्षेला बसावे लागते व मोकळ्या जागा भराव्या लागतात व निवडानिवड करावी लागते. या परिक्षेत श्रेष्ठ दर्जा मिळवण्यासाठी मी कोण? कोठून आलो? जाणार कोठे? सारखे गहन प्रश्न सोडवावे लागतात. ते सोडून दिले तरी सर्वसाधारणपणे पास होण्यास पोकळया भरण्याचे ज्ञान प्रत्येकास असावयास पाहिजे. तरच जीवन सुखी होईल.

● ● ●

# जरी हे शरीर गेलो मी सोडून तरी मी धावेन भक्तांसाठी

● **विलास शं. वैद्य** दादर

नक्की आठवत नाही, पण तीन–चार वर्षापलिकडची गोष्ट असावी. एवढं मात्र नक्की आठवतय की तो मे महिना होता. नुकत्याच परिक्षा संपलेल्या, त्यात चार-दोन मित्रांचा नियमीत जमणारा हौशी कंपू!! मग काय .... 'कुठतरी' जाऊया असं म्हणायला आणि जाण्याच्या ठिकाणाची निश्चिती व्हायला कितीसा वेळ! बरीच स्थळं पुढे आली ..., मायेरान ... महाबळेश्वर.. इत्यादी. कुणाचंच एकमत होत नव्हत. मग मीच बोललो, माथेरान, व महा-बळेश्वर आपण कितीदा पाहुयलय, जे पाहिलंय ... अनुभवलंय तेच पाहण्यात काय मजा ... ह्यावेळी आपण शिरडीला जाऊ. मी निर्धारानं बोलल्यागत बोललो.

एक क्षण, फक्त एकच क्षण विलक्षण शांतता पसरली. कदाचित मी सुचविलेलं स्थान त्यांना अप्रिय नव्हतं पण अनपेक्षित खासच होतं.

'ओ येस ... चालेल! नक्कीच चालेल!!'

सर्वांनी एकदम निकाल दिला मलाही मनस्वी आनंद झाला.

प्रवासाची तारीख उजाडली. मे महिन्याचे सुट्टीचे दिवस. ट्रेनला उदंड गर्दी ! माणसावर माणसं कोंबून भरल्याणत भरलेली. आमचं रिझर्वेशन नाहीं. जिथं वारा शिरायला जागा नाहीं, तिथं आम्ही काय घुसणार ! सारी गाडी जागेसाठी कमीत कमी ३।४ वेळा तरी फिरलो. (अर्थात प्लॅटफॉर्मवरून) जिथ घुसता येईल अशी शक्यता वाटत होती तिथ घुसण्याचा प्रयत्नसुद्धा केला, पण एक-दोन अवाच्य शब्द आणि ढकला ढकली ह्या व्यतिरिक्त काहीच घडलं नाही.

अशातच पाच-सात मिनिटं गेली असतील. 'काय करावं ?' ह्या विचारात आम्ही उभे होतो. शेवटी आता तिकिटे फुकट गेली तरी चालतील पण घरी जाऊ या, ह्या निर्णयाप्रत आम्ही येऊन पोहोचलो. १।२ वेळां उगाचच मागे पुढे केल आणि मग सर्वांनी निर्धारानं घराकडे वळण्यासाठी बॅग्ज उचलल्या आणि ......

'अरे पोरांनू ......'

कोणाच्या तरी लगबगीने आलेल्या शब्दानं आमची पावलं थांबली. मी वळलो. एक म्हातारा हमाल, सफेद दाढीचा, मध्यम उंचीचा लगबगीनं येत होता.

'कुठं जानार पाव्हन, शिरडीला नव्हें का ?'

मी थोडासा चमकलो मी काही बोलणार त्या आधीच तो आम्हां सर्वांवर नजर टाकत म्हणाला,

'पोरांनू विंजीनापासून दुसरा डबा आहे, त्यात चढा. जागा हमकास व्हाई बघा !'

आम्ही उगाच हसलो, उपहासानं म्हणा किंवा अविश्वासानं !! आम्ही तुटकपणे त्याच्याकडे पाहिलं आणि मुकाट बॅग्ज उचलल्या आणि पुन: बाहेरच्या दिशेनं निघालो. तो म्हातारा हमाल पाळतीवर होताच.

'पोरांनू, अरे एकदा जाऊन तर पघा, ह्या म्हाताऱ्याचं शब्द वाया न्हाई जानार. "

मी थांबलो, निश्चयानं माझ्या बरोबरचे मित्रसुद्धा थांबले आणि मग धावत सुटलो त्या डब्याच्या दिशेनं, ज्यात त्या म्हाताऱ्यानं जागा मिळेल असं सांगितल होतं. डबा तुडुंब भरलेला. आम्ही अनेक धक्के, शब्द सहन करीत आत घुसलो. आत जागा असणं शक्यच नव्हतं. एक मिनिटसुद्धा उलटला नसाव, इतक्यात समोरच्या बाकड्यावरची दोन माणसं उठली आणि बराचवेळ स्वत:करीता राखून ठेवलेल्या तीन सीटस् आम्हांला देत ती माणसं म्हणाली, 'बसा साहेब, बसा. प्रसंग खरोखरीच विलक्षण होता. एक क्षण आम्हांला खरं खरंच वाटेना आम्ही त्या सीटस् ताब्यात घेतल्यावर ती माणसं समोरच्या दोन वयस्क

बायकांकडे बोट दाखवून म्हणाली, 'ह्या मनमाडला उतरतील, कृपया त्यांना काही मदत लागलीच तर द्या!' आम्ही आनंदानी मान डोलावली.

थोड्याच वेळानं गाडी हलली. प्लॅटफॉर्म सोडल्यावर गाडीच्या खिडकीतून गार वारा आत आला. एका क्षणात सारा थकवा दूर झाला. सारा गोंगाट कोलाहल आता थांबला होता. मन शांत होतं. आणि अचानक मला त्या म्हाताऱ्या हमालाची आठवण आली. विचारांचा एक झंझावात मनात उसळला. तो हमाल ...पांढऱ्या दाढीचा हमालच होता का? त्याला कसं ठाऊक आम्ही कुठं जाणार ते. डब्यात इतकी गर्दी असताना, त्या सद्‌गृहस्थांनी आम्हालाच का जागा द्यावी ......विचारांचा गुंता वाढत होता. आणि मनात एक नवीन भावनेचा, श्रद्धेचा जन्म होत होता. मन म्हणत होत, अरे तोच तो ज्याची अनंत रूप आहेत, अनंत नावं आहेत, जो नाथांच्या घरी चंदन घासतो, जो संत जनाबाईच्या भक्तीपोटी तिच्या घरी पाणी भरतो. दामाजीपंतांच्या वरती बालंट येऊ नये म्हणून जो महाराचं रूप घेतो तोच तो परम दिन दयाळू जो अनंताचा स्वामी आहे, तोच आज तुझ्यासारख्या सामान्यांसाठीही अगदी सामान्य बनून धावून आला.

माझे हात माझ्या नकळतच जोडले गेले. मन तर कधीच श्रीसाई चरणाची धूळ लावून पवित्र झालं होतं.

● ● ●

# श्रीसाईनाथ

## ( श्रीसद्गुरू साईमहाराज ललितचरित्र )

### लेखांक शेवटचा

र. श्री. पुजारी (पुणे)



र. श्री. पुजारी

**श्रीसाईनाथ चरित्रमालेचा हा शेवटचा लेखांक आहे. गेले अडीच-वर्ष ही लेखमाला श्रीसाईलीले-तून सातत्याने प्रकाशित झाली. या लेखमालेचे लेखकांना शालेय जीवनापासूनच श्रीरामकृष्ण परमहंस, विवेकानंद, स्वामी रामतीर्थ अशा थोर पुरुषांच्या चरित्रांची ओढ. ज्ञानेश्वरी, दासबोध**

**अशा ग्रंथांचे वाचन करण्याची हौस. कथा, कविता यांच्या लेखनात रमण्याचा छंद. पुढे सत्यकथा, प्रसाद, वसंत, हंस, नवयुग इत्यादी नियतकालिकांतून कथालेखन. गेल्या काही वर्षात नामयोगी, योगीश्वरी, सर्वेश्वर, राष्ट्रगुरू. दत्तगुरू, सिद्धयोगी आणि साईनाथ या सात ललित गद्यचरित्रांचे आणि दोन पद्यचरित्रांचे लेखन. संतचरित्रांचे वाचन – मनन – चिंतन – लेखन यामुळे चित्तशुद्धी होऊन निरामय जीवन लाभते ही दृढ श्रद्धा. आजच्या तमोयुगात संतचरित्रेच आबाल-वृद्धांच्या मनाचे क्लेश नाहीसे करून त्यांना ज्ञानदीप दाखवितील ही जीवननिष्ठा. त्या निष्ठेस अनुसरून सर्व लेखन लेखक महाशयांनी केले. वाचकांनी या लेखमालेचे स्वागत केले. आम्हीही त्यांच्या या लेखमालेचे कौतुक करतो व अशाच प्रकारचे लेखन त्यांचे लेखणी द्वारे व्हावे अशी सदिच्छा नववर्षदिनी प्रकट करतो.**

### ६०. बाबा स्वतःच मुरलीधर होऊन वाड्यात कायमचे राहायला आले.

मृत्यू, अपयश, हानी – अशा अप्रिय बातम्यांना पायच नव्हे तर पंखही असतील का ? मनोवेगाने त्या धावत असतील का ?

बाबा गेले त्याच रात्रीच्या पहाटेस पंढरपुरास दासगणूंना स्वप्न पडले. स्वप्नात बाबा आले आणि म्हणाले, "गणू ! ऊठ, ऊठ ! चल आधी शिरडीला ! माझी मशीद ढासळून पडली ! त्या तेल्या-वाण्यांनी छळ मांडला म्हणून त्रासून, शिरडी सोडून मी निघालो ! येथें आलो !

गणू ! आता एक इच्छा पुरी कर. बख्खळ फुले आणून मला फुलांनी सजव !" .

इकडे शिरडीस तोपर्यंत रात्रभर काथ्याकूट चालला होता. अंत्यसंस्कार कोणत्या प्रकारे करायचे यावर मोठच वादंग माजले होते. हिंदूचे म्हणणे एक होते. मुसलमानाचे म्हणणे निराळेच होते.

कोणी म्हणत होते, "या मृतदेहाला आता हिंदूंना स्पर्श करू देऊ नये. समारंभाने असेच कबरस्तानास न्यावे." दुसरे कोणी म्हणत होते, "हा देह असाच उघड्यावर ठेवावा. त्याच्यावर एक सुंदर असे थडगे बांधावे. म्हणजे मुसलमान समाजाचे ते एक पवित्र स्थान होईल."

अमीर शक्कर 'खुशालचंद वगैरेंचा विचार हा होता. मुसलमान समाजातील बहुसंख्य मंडळींचा पाठिंबा याच मताला होता. तर रामचंद्र पाटील, बाळा वाणी, म्हाळसापति, काकासाहेब दीक्षित, श्रीमंत बुटी यांचा विचार बाबांचा मृतदेह बुटी-वाड्यात असावा असा होता.

देह बुटी-वाड्यात असावा असे म्हणण्यामागे एक कारण होते. ते आता सर्वांना स्पष्टपणे कळून चुकले होते. त्यानुसार हा आग्रह होता.

बुटी-वाड्याचे बांधकाम चालू असताना भव्य अशा त्या दालनात पूर्वेकडे तोंड करून एक सुंदर असा गाभारा बांधावा व त्यात मुरलीधराच्या मूर्तीची स्थापना करावी अशी मूळ कल्पना.

एक दिवस बाबा लेंडीवर चालले असताना माधवराव त्यांना म्हणाले होते, "बाबा, हा नारळ हाती घ्या. आत या. गडी-गवंडी मुरलीधराचा गाभारा खोदत आहेत. त्यावर एक दृष्टी टाका. म्हणजे कार्य निर्विघ्नपणे सुफळ होऊन तडीस जाईल."

गाभाऱ्याचे ते काम पाहून बाबा मोठे प्रसन्न दिसले होते. म्हणाले होते "चांगले शुभकाम आहे. नारळ फोडा."

नंतर त्या जागी मन रमल्याप्रमाणे बाबा बोलले होते, "शामा, आपण समस्त बाळगोपाळमंडळी येथेच राहू. उठता-बसता सुखदुःखाच्या गोष्टी येथेच करू. पोरासोरांना, आल्यागेल्यांना बसा उठायला ही जागा छान आहे. शांत आहे. येथे मनास कसे प्रसन्न वाटते !"

एवढे बोलून, माधवरावांच्या खांद्यावर हात ठेवून बाबा म्हणाले होते, "शामा हा देहसुद्धा या वाड्यातच पडो बंध."

परंतु सबंध रात्र लोटली तरी सर्वांचे मत एक होईना. वादंग काही संपेना. जणू हे वादंग आता जिवंत होऊन ऐकणार नाहीत ! एखादा शब्द फटकन् बोलून दुही माजविणाऱ्यांना ताळ्यावर आणणार नाहीत !

तोच इकडे पहाटेच्या सुमारास घरी लक्ष्मणमामांना स्वप्न पडले. स्वप्नात बाबा आले. लक्ष्मणमामांचा हात धरून त्यांना उठवीत म्हणाले, "मामा ! ऊठ ! बापसाब काही आज येणार नाही. मी मेलो असाच त्यांचा समज आहे. तर तू उठून पूजा-काकडआरती कर."

लक्ष्मणमामा हे शिरडीचे ग्रामजोशी. माधवरावांचे सख्खे मामा. भल्या पहाटे उठून, स्नान करून, वृत्तीने कर्मठ असूनही आधी मशिदीत येऊन बाबांची पूजा करीत. मग तेथून बाहेर पडून गणपती, शनी, शंकर, मारूती यांच्या मंदिरात जाऊन पूजा करीत.

साहजिकच आजही लक्ष्मणमामा पूजेसाठी मशिदीत आले. बाबांच्या मुखावरील वस्त्र काढत मोठ्या प्रेमाने बाबांच्या मुखाचे अवलोकन केले.

मौलवी वगैरे मुसलमान लोक बाबांच्या देहास स्पर्श करण्यास विरोध करीत होते. तरी मामांनी तो विरोध जुमानला नाही. बाबांचे चरण प्रक्षालन केले. नेहमीप्रमाणे त्यांना गंध-अक्षता-फूल-तुलसीपत्र वाहिले. धूप-दीप-नैवेद्य-नीरांजन वगैरे केले. मग मूठ उघडून विडा-दक्षिणा बाबांच्या हाती दिला. प्रार्थनापूर्वक साष्टांग नमस्कार केला. सर्वांना प्रसाद दिला. आपल्या कपाळी तिलक रेखला मग इतर देवांच्या पूजेसाठी नित्याप्रमाणे ते बाहेर पडले.

बाबा हे आपले आद्य दैवत कुलदैवत. उपास्य दैवत. मग ते हिंदू आहे का मुसलमान आहे का आणखी कोण्या जातीचे आहे हा विचारही मामांच्या मनाला शिवला नाहीं. विचार एकच बाबांचे आजचे पूजन हे शेवटचे हा योग आयुष्यात अतःपर पुन्हा येणे नाहीं.

लक्ष्मणमामांनी अश्रुपूर्ण नेत्रांनी केलेली ही शेवटची काकडआरती, पूजा पाहून अनेकांचे अश्रू पुन्हा अनावर झाले. परंतु एक समज दृढ झाला : बाबा अजून गेले नाहीत. डोळे मिटून पडून आहेत.

या समजामुळे दुपारी बापुसाहेब जोग पुन्हा मशिदीत आले. बाबांची आरती केली. प्रसाद वाटला. बाबांची प्रार्थना करून म्हणाले, "सद्‌गुरो पूजा-आरती विषयी मनात जो किंतू निर्माण झाला त्याबद्दल बालकास क्षमा असावी. आपले चिन्मय स्वरूप या देहातच नव्हे पण सर्व अणुरेणुत भरून उरले आहे याची आज प्रचीती आली."

दोन्ही जमातींचा विचारविनिमय अजून सुरूच होता. तोच म्हाळसापती अश्रूपूर्ण नेत्रांनी सर्वांच्या पुढे येऊन उभे राहिले. दोन्ही हात जोडून सर्व पुढारी मंडळींना म्हणाले, "माझी एक विनंति म्हणा, प्रार्थना म्हणा, आहे. ती सर्वांनी ऐकावी. अंत्यविधीची घाई एवढ्यात करू नये."

म्हाळसापतींची गुरूचरणी अनन्य निष्ठा, त्याग, तपस्या, पूर्ण निरपेक्षवृत्ती या सर्वांचा प्रभाव तेथील मंडळीवर एका क्षणात पडला. त्यामुळे म्हाळसापतींचे शब्द मंडळी ऐकू लागली.

म्हाळसापती म्हणाले, "आपणा सर्वांवर बाबांच्या वियोगाचा हा जो प्रसंग आज येऊन ठेपला आहे तो बेचाळीस वर्षांमागेच आला असता. पण बाबांनीच आम्हां कच्च्याबच्च्यांचे भवितव्य जाणले आणि तो बेत रहित केला.

एका मार्गशीर्ष शुद्ध पौणिमेला म्हणजे दत्तजयंतीस बाबांच्या दम्याच्या विकाराने फारच उचल खाल्ली. वरचा श्वास वर आणि खालचा श्वास खाली झाला. हे देहक्लेष सहन होईनात, तेव्हा बाबांनी आत्मा ब्रम्हांडी चढविला म्हणाले : आता येथून तीन दिवस आम्ही आमचा प्राण ब्रम्हांडी नेऊन ठेवतो. तरी आम्हाला उठवू नका. जाग आणण्याचा प्रयत्नसुद्धा करू नका. तथापि एक गोष्ट करा. ती म्हणजे खाली सभामंडपात डाव्या हाताला जो कोपरा आहे तेथे समाधी खणून आत मला नुसते ठेवून द्या. बाहेरच्या बाजूस वर दोन लाल निशाणे लावून ठेवा. म्हणजे सर्वांच्या ध्यानी येईल की इकडे कोणीही फिरकू नये.

असा तीन दिवस माझा देह रक्षण करा. रात्रंदिवस अगदी डोळ्यात तेल घालून रक्षण करा. चौथ्या दिवशी मी डोळे उघडीन आणि पूर्वस्थितीस येईल याची खात्री बाळगा."

एवढे बोलून बाबांनी एकाएकी प्राण ब्रम्हांडी नेऊन ठेवला. त्यांचा निचेष्ट देह मात्र माझ्या मांडीवर राहिला.

रात्रीचे दहा वाजलेले. बाबांचा थंडगार देह माझ्या मांडीवर. श्वास नाही, नाडी नाही की जिवंतपणाचे कोणतेही चिन्ह नाही. हे पाहून सबंध शिरडी गाव जमला. मला म्हणू लागला ; "भगत, खरे सांगायचे म्हणजे बाबा गेले. आता उगाच वाट पहाण्यात काय अर्थ ? आपण सर्वांना बाबांच्या मरणानें धक्का बसू नये म्हणून बाबांनी केलेली ही युक्ति आहे. आशा दाखवून केलेली ही आपली भुलावण आहे."

असे दोन दिवस गेले. मौलवी, मुलनाफकीर, काशीराम शिंपी, अप्पा कुलकर्णी असे सर्वजण मला म्हणू लागले. भगत, आता वाट पहाण्यात अर्थ नाही. प्रेताला मूठमाती देण्याची काही तरी व्यवस्था केली पाहिजे.

पण माझी मनोदेवता मला सांगत होती की बाबा पुन्हा शुद्धीवर येणार. पूर्वीप्रमाणे सर्व व्यवहार करू लागणार. कारण असे की बाबा योगी. समाधी लावणारे. अखंड योग, धौत-पाती इत्यादी करणारे. योगबलामुळे हात-पाय-डोके यांचा वियोग करून पुन्हां नंतर संयोगही करणारे. त्यांना तीन दिवसांचीही समाधी लावणे काय अशक्य !

बाबांच्या योगबलाचा अनुभव डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहून घेतल्यामुळे काहीं-जणांना माझे म्हणणे पटले. ते म्हणाले म्हाळसापती म्हणतात ते बरोबर आहे.

तीन दिवस संपल्यानंतर बाबा निश्चितपणे उठणार. तरी मूठमाती देण्याची इतकी घाई करू नये.

अशी भवती न भवती होईपर्यंत तीन दिवस पुरे झाले. ते पुरे होताच पहाटे तीनच्या सुमारास बाबांच्या देहात हळूहळू चेतना येऊ लागली. श्वासोश्वास, पोट हलणे या क्रिया दिसू लागल्या. झोपेतून जाग यावी त्याप्रमाणे आळोखे पिळोखे देऊ लागले. डोळे उघडू लागले. काही वेळातच चेहरा प्रसन्न दिसू लागला. पूर्णपणे सावध झाले.

हे सर्व पाहून मला वाटू लागले : लोकांचे ऐकून मी मांडी काढली असती तर माझ्या हातून फार मोठे म्हणजे गुरुहत्त्येचे पातक घडले असते. सबंध जन्मभर मनाची ही जखम वाहत राहिली असती. पापाच्या बोचणीने मी कदाचित माणसातही राहिलो नसतो.

माणसाची आशा मोठी चिवट असते. म्हाळसापतीचा हा विचार सर्वांनाच पटला. आणखी छत्तीस तास म्हणजे पूर्ण तीन दिवस होईपर्यन्त वाट पहावी, तोपर्यंत अंत्यविधीचा हा वाद थांबवावा असे ठरले.

एवढ्या अवधीत दासगणू आले. नानासाहेब चांदोरकर आले. बाळासाहेब देव आले. अण्णासाहेब दाभोळकर आले. बाबांशी संबंधित अशी शेकडो भक्त मंडळी आली. गुरुपौर्णिमेच्या किंवा रामनवमीच्या उत्सवाहूनही अधिक गर्दी मशिदीसमोर लोटली.

दासगणूंचे पोरकेपण अश्रूंच्या अनावर ओघांमुळे सर्वांना विशेष जाणवत होते. 'खरे प्रेमाचे, मायेचे, आधाराचे छत्र आज गेले,' असे नानासाहेबांना, काकासाहेबांना, म्हाळसापतींना ते पुनःपुन्हा म्हणत होते. प्रेमळ पित्याप्रमाणे पदोपदी असलेले मार्गदर्शन आठवीत होते.

एकदा शिरडीत कीर्तन होण्याच्या वेळी पोशाखाचा थाट करून दासगणू बाबांच्या दर्शनासाठी गेले. त्यावेळी बाबा त्यांना म्हणाले होते, "वाहवा ! अगदी नवरदेवच सजलास की ! हा अंगरखा, हा फेटा, हे उपरणे – हा एवढा सरंजाम कशासाठी ! उतर तो सर्व भार आधी अंगावरून ! अरे, हरिकथेला दुसरे काय लागते ! हाती चिपळ्या, गळा माळ आणि हृदयी भाव असला की बस्स ! तो श्रीहरी खूष !

त्या श्रीहरीच्या प्राप्तीसाठी तर प्रत्येक श्वास. प्रत्येक क्षण. प्रत्येक शब्द. पोशाखाच्या सरंजामामुळेच जर तो दुरावला तर त्या हरिकथेचा उपयोग कोणता ?

बाबांना हरिनामाइतके प्रिय काहीही नव्हते – काहीही नाही. बाबांच्या आठवणी काढून अश्रू गाळण्याऐवजी त्यांच्या प्रिय हरिनामाचा घोष आम्ही

सर्वांनी जर येथे चालविला तर तो घोष बाबांना प्रिय होईल. म्हणतील, "पोरांनी माझी आज्ञा पाळली." माझी खरी सेवा हीच."

मशिदीचा परिसर हरिनामाच्या गजरामुळे दुमदुमून सोडला. तो ऐकून गावातील भजनी मेळेही तेथे जमले. भजन करू लागले. त्या सर्वांचा गगनावेरी पोचलेला नाद ऐकून लोक म्हणू लागले, "आज साक्षात वैकुंठच बाबांसाठी खाली उतरले.

आता दुःख, शोक, अश्रू, उसासे यांना थारा नाहीं. बाबांना ते आवडणारही नाहीं. बाबांच्या महानिर्वाणाच्या निमित्ताने आज खरा हरिदिन उगवला. या मंगल प्रसंगी सर्वांनी एक हरिनाम घ्यावे. गावे, कंठी धारण करावे. हरिनामा-इतके बाबांना काहीही प्रिय नव्हते. आजही नाही, पुढेही असणार नाहीं."

काही क्षणातच हरिनामाच्या मंजुळ बासरीमुळे सर्वांचे हृदय एक झाले. सर्व हात एक झाले. हरिनामाचा एकच मंगल-मधुर नाद सर्वत्र भरला. भक्ति-रसाच्या त्या शांत नादरवात शोकाकुल मने शांत शांत होत गेली. जणू हरिनामाने सबंध शिरडीवर काही जादू केली.

काही क्षण अशा, शांत निरामय अवस्थेत गेले असतील नसतील. लहान थोर, हिंदू-अहिंदू, सर्व भक्त एक झाले. न कळतच रामचंद्र पाटलाकडे गेले. म्हणाले, "बाबांची इच्छा तीच आमची इच्छा. बाबांच्या शब्दापलिकडे आजवर आम्ही गेलो नाही. पुढेही जाणार नाहीं. बाबांच्या इच्छेप्रमाणे समाधी बुटी-वाड्यात होण्यास आमची हरकत नाही. उलट आनंदच आहे. बाबांची शेवटची आज्ञा पालन केल्याचे समाधानच आहे."

लोकांचा हा एकमुखी निर्णय कानाने ऐकला मात्र, श्रीमंत बापुसाहेब बुटींचे डोळे आनंदाश्रूंनी वाहू लागले. काकासाहेब दीक्षितांना ते म्हणाले, "काका माझ्यासारखा भाग्यवंत जगात दुसरा नसेल. माझ्या इच्छेखातर स्वत: बाबांच मुरलीधर झाले आणि वाड्यात कायमचे राहायला आले !"

**६१. हे बाहु पसरून तुम्हासाठीच मी येथे उभा आहे.**

खरोखरच दिवस कसे हां हां म्हणता जातात ! जणू जे घडले ते कालच. नुकतेच काही क्षणापूर्वी.

बाबांना जाऊन आज दहा दिवस झाले. उद्या अकरावा दिवस. परवा बारावा दिवस. त्याच्या पाठोपाठ तेरावा आणि चौदावा साजरे झाले की उत्तरकार्यही संपले ! जो तो आल्या वाटेने परत चालला !

गंगेच्या म्हणजे गोदेच्या दक्षिण तीरावरील उंच टेकडावर टांगे जोडून तयार होते. त्यात बसून मंडळी शिरडीकडे निघाली. गंगामाई मागे पडली. हळू हळू दृष्टिआडही झाली.

गंगामाई दृष्टिआड झाली तरी तिच्यावरील तिलांजलीचा प्रसंग दृष्टिआड होईना. पिंडप्रदानाचा विसर पडेना. जणू शिरडीच्या मशिदीत गेली साठ वर्षे वाहात असलेली प्रेमगंगा आता या गंगेला मिळाली. हरिद्वार होऊन विषय भक्तांची वाट पाहात येथे येऊन थांबली.

कोपरगावाहून शिरडीला येण्याचा हा नेहमीचा मार्ग. भक्तांच्या मनात आज पाच तपे आनंदोर्मी निर्माण करणारा हा मार्ग. तो मार्ग आज सुना सुना झाला. या मार्गावर कोणी कोणाशी एका अक्षरानेही बोलेना. टांग्याबाहेरील दसरा-दिवाळीच्या प्रसन्न निसर्गाकडेही पाहीना. जणू मातोश्रींच्या निधनानंतर सुन्या झालेल्या घरी निघालेली ही कोणी मुले. एका थोर माऊलीची पोरकी झालेली लेकरे.

टांग्यात बसल्याक्षणापासूनच नानासाहेब चांदोरकरांचे मन भरून येऊ लागले. बाबांच्या शेकडो आठवणी आकाशातील मेघांप्रमाणे मनात गर्दी करू लागल्या. डोळे पुनःपुन्हा वाहू लागले. ते न पुसताच नानासाहेब स्वतःशी बोलू लागले. म्हणू लागले : प्रपंचाचा व्याप मागे कितीही असला तरी आईचा सर्व जीव मुलांच्या कल्याणात, त्यांच्या हातून घडणाऱ्या बऱ्यावाईट अशा प्रत्येक गोष्टीत. देव, संत, वडील, गुरू, यांच्याबाबतीत त्यांच्या हातून काही वावगे वर्तन तर घडत नाहीं ना इकडे !

एके प्रसंगी याच कोपरगावी माझ्या हातून एक प्रमाद घडला. तो असा की मी स्टेशनवर उतरलो. तेथून थेट शिरडीचा टांगा ठरविला. वाटेत उतरून दत्ताचे दर्शन न घेताच आलो !

माझे साडू बिनीवाले त्यावेळी माझ्याबरोबर होते. बिनीवाले परम दत्त-भक्त. वाटेत दत्तमंदिर लागताच खाली उतरून दत्तदर्शन घेण्याची त्यांना तीव्र इच्छा झाली. पण मीच त्यांना आडकाठी केल्यासारखे केले. म्हणालो, "आता आपण येथे थांबलो तर शिरडीस पोचण्यास उशीर होईल. ऊन्हही होईल. करिता आपण परत येताना दर्शन घेऊ."

बिनीवाल्यांना मी असे म्हणालो खरा, पण मनात विचार चालले होते ते निराळेच. मनात मी म्हणत होतो : साक्षात परब्रम्ह, दत्तावतार असे बाबा शिरडीस मशिदीच्या पायरीवर माझी वाट पाहात उभे असताना या निर्जीव पाषाणमूर्तीच्या दर्शनाचे स्तोम मी इतके का माजवावे ? मूर्तीची योजना चित्त स्थिर नसलेल्या अज्ञ भक्तांसाठी !

शिरडीस जाऊन मस्तक बाबांच्या चरणी ठेवले, तेव्हा आढळले की बाबा माझ्यावर रागावले आहेत.

हे पाहून मी त्यांचे पाय घट्ट धरले. अनेक परींनी त्यांची विनवणी केली. रागाचे कारण विचारले. तेव्हा ते म्हणाले, "नाना! इतकी वर्षे माझ्या संगतीत राहून हेच शिकलास काय? कोपरगावास उतरल्यापासून येथे मशिदीत येईपर्यंत वाटेत काय काय घडले? ते सर्व तुझे तूच आठव! त्याबद्दल तुला शिक्षा कोणती झाली हेही आठव! अरे, श्रीदत्तगुरूंसारखे सर्व जगास पूज्य असलेले दैवत वाटेत तुझ्यासाठी एवढे तिष्ठत उभे असताना निर्लज्जपणे तू तसाच पुढे निघून आलास याला काय म्हणावे! तरी बरे, तू नुसत्या पायात मोडलेल्या काट्यावरच सुटलास!"

काका महाजनींचे एक मित्र पट्टीचे विद्वान. गाढे पंडित. सगुणपूजा म्हणजे दगडाधोंड्यांची पूजा असे त्यांना वाटे. गंध, फुले मूर्तीवर वाहाणे हा तर त्यांना शुद्ध वेडाचार वाटे. अशा निर्गुणवादी गृहस्थांनाही बाबांनी सगुणांचे साकाराचे, महत्त्व पटविले. ते बाबा, माझ्यासारख्या अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या आपल्या पोराला काय तसेच सोडतील! ते जणू या दत्तदर्शनाच्या निमित्ताने मला म्हणाले : "नाना! तुझे चित्त स्थिर झाले असे तुला कोणी सांगितले? मशिदीतील त्या सुंदर स्त्री-दर्शनाचा प्रसंग थोडा आठवून पाहा बरे!

नानासाहेबांना तो प्रसंग आजही आठवला. मान शरमेने खाली झाली. मनाची दुर्बलता पुनःपुन्हा अस्वस्थ करू लागली. तरी बाबांचे प्रेमळ शब्द मनास पुनःपुन्हा धीर देऊ लागले. म्हणू लागले. "नाना! काळजी करू नको. बनत बनता बनेल."

सद्गुरुंच्या चरणी सर्व तीर्थे, सर्व विद्या हे आज अनेक वर्षे मी गुरुगीतेत वाचीत होतो. मुखोद्गत असल्यामुळे बोलत होतो. तरीसुद्धा एका भ्रमात होतो. तो भ्रम असा की, एका यवन गुरूला संस्कृतभाषेतील वेदांत काय कळणार! त्यातून माझे गुरु तर अगदीच अडाणी! निरक्षर!

पण हा भ्रमही एक दिवस बाबांनी माझ्या मनातून काढून टाकला. 'प्ररिप्रश्न' आ 'सेवा' या गीतेतील दोन पदांच्या अनुषंगाने मला एक तासभर छेडले! माझ्या विद्वत्तेचे पितळ उघडे पडले! माझ्या आजवरच्या सर्व अपराधांची क्षमा करून साक्षात श्रीगीतेचे हृदय या प्रसंगाच्या निमित्ताने मला उकलून दाखविले!

खरोखर, साक्षात परमात्मा ज्यांचा ऋणी, अशा माझ्यासारख्या भाग्यवंतांना आयुष्यात मिळविण्यासारखे आता काय उरले? तरी पण मनास राहून राहून वाटते बाबांची ती मूर्ती पुन्हा दृष्टीस पडणार नाही. तिचा अमृतस्पर्श आता या देहास पुन्हा घडणार नाही.

इकडे दुसऱ्या एका टांग्यात माधवराव उर्फ शामराव बाबांच्या अशाच कित्येक आठवणी काढून मनोमन शोक करीत होते. म्हणत होते देवा ! मी तर तुम्हाला चारचौघांप्रमाणेच समजलो. तुमच्याशी सलगी केली. भांडलो. तुमच्यावर रागावून तुम्हास टाकूनही बोललो. पण तुम्ही ते मनावरही घेतले नाहीं. उलट त्या श्रीहरीने अर्जुनाला जसे चुचकारले, मानेने जवळ घेतले, आपल्या हृदयाचा कलिजा मानले, तसे मला तुम्ही मानले. गुह्यातील परम गुह्य असे जे काही ते मला सांगितले. जणू मी तुमचा सखा ! सुहृद ! सवंगडी !

आता वाटत आहे की चोर, लबाड, मतलबी, खोटारडा या शिव्यांनी मी जी तेव्हां तुमची पूजा बांधली त्याऐवजी एक जरी गोड शब्द तुमच्याशी बोललो असतो तर आता आयुष्यभर जी बोच, मनास लागून राहील ती राहिली नसती.

आण्णासाहेब दाभोळकरांचा स्वभाव दासगणूंप्रमाणे हळुवार नव्हे. डोळ्यात अश्रू उभे राहिले तरी काकासाहेब दीक्षितांप्रमाणे मन कोणत्याही क्षणी भावनाविवश होणारे नव्हे. औरंगाबादेहून आलेली पाल मशिदीच्या भिंतीवरील पालीस भगिनीप्रेम अनावर होऊन भेटली किंवा भर दुपारी धुनीने मशिदीत पेट घेतला असताना बाबांनी केवळ हातातील सटका आपटून तिला शांत होण्याची आज्ञा केली किंवा संबंध शिरडीगाव झोडपून पाणी पाणी करणाऱ्या मेघांना बाबांनी वृष्टी थांबविण्याची सक्त ताकीद दिली – या किंवा अशा गोष्टींनी भारावणारेही नव्हे.

तरीसुद्धा बाबांच्या काही विशेष आठवणी पुनःपुन्हा मनाच्या दाराशी येऊन डोकावीत असल्यामुळे ते गहिवरत होते. म्हणत होते : कोण्या जन्मीचे कोणते अल्पसे पुण्यकृत्य उदयाला आले कळत नाही. कल्पना नसतानाही या जन्मी संतसंग घडला. जन्मोजन्मीच्या अविद्येच्या अंधारात फसलेले पाऊल संतसेवेकडे वळले. आता ती सेवा त्यांच्याच कृपेने अखंड घडली की जीवन कृतार्थ झाले ! जन्म-मृत्यू, सुख-दुःख, प्रेम-मत्सर यांच्या पलिकडे जाऊन पोचले ! उचंबळणाऱ्या त्या अखंड आनंदाच्या सागरात विलीन होऊन त्या अमर्याद, अतुल, शाश्वत आनंदसागराशी एकरूप होऊन गेले !

बाबांनी आपले चरित्र लिहिण्यास संमती दिली तो स्वर्गीय आनंदाचा क्षण आण्णासाहेब दाभोळकरांना आज पुनःपुन्हा आठवू लागला. डोळे अक्षरशः भिजवू लागला. एखाद्या चित्राप्रमाणे जसाच्या तसा डोळ्यांपुढे पुनःपुन्हा उभा राहू लागला.

त्या दिवशीही बाबांकडे हा विषय काढण्याचा धीर अण्णासाहेबांना होईना. आत-बाहेर करू लागले. तोच देवाने पाठवावे तसे माधवराव मशिदीच्या पायरीवर येऊन उभे राहिलेले दिसले !

माधवराव जात्याच धीट, निर्भिड, व्यवहारचतुर. त्यांनी इकडे तिकडे पाहिले. जवळपास तिसरे कोणी नाहीं ही संधी साधवली. बाबांच्या चरणी वंदन केले. मग अत्यंत खाजगीत एखादी गोष्ट विचारावी तसे ते बाबांना म्हणाले, "देवा ! हे अण्णासाहेब म्हणतात, की अल्पबुद्धिला सुचेल तसे तुमचे चरित्र आपण लिहावे. हा विषय त्यांच्या मनात फार दिवस घोळत आहे. पण त्याला देवा तुमची परवानगी पाहिजे. कृपा पाहिजे. त्याशिवाय ते काय लिहिणार ?"

बाबा आपले बोलणे शांतपणे ऐकून घेत आहेत हे पाहून माधवराव पुन्हां बाबांच्या पोटात शिरून बोलू लागले. माझी वकीली करू लागले. म्हणाले "मी काय एक भिकारी ! दारोदार फिरून, तुकडे मागून, कसें तरी ओलेकोरडे करून दिवस काढणारा ! माझ्यासारख्याचे चरित्र आणि कशाला ! लोकांच्या टवाळीचाच तो आणखी एक विषय असे बाबा ! तुम्ही म्हणू नका. आमच्या चांगल्या बेताला मोडता घालू नका."

इकडे माधवरावांच्या मागे बसून, हात जोडून मनातल्या मनात मीही बाबांना हीच प्रार्थना करू लागलो. म्हणू लागलो ! देवा ! माझे मनोगत माधव-रावांनी आपल्या कानावर घातलेच आहे. खरोखर आपले चरित्र म्हणजे एक हिरा आहे. तो कोणीतरी कोंदणात जडविला पाहिजे. पण आपली कृपा नसेल तर लिहिणाराची लेखणी काय चालणार ? कशी बोलणार ? तिला बोलती करणारे, अखंड चालविणारे धनी एक आपणच ....

माझी ही प्रार्थना ऐकून बाबा म्हणाले, "असे म्हणतोस ? मग तुझी इच्छा पुरी होईल जा."

बाबांच्या मुखीचे आशीर्वादाचे हे शब्द ऐकून पुढे होऊन मी बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. पूर्ण कृपा दृष्टी मजवर असावी म्हणून प्रार्थना केली. यावर बाबांनी आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्याने माझ्या कपाळी उदी लावली. मग तोच हात मोठ्या कृपापूर्ण वात्सल्याने माझ्या मस्तकावर ठेवून म्हणाले, "आठवणी, गोष्टी, अनुभव आपण गोळा करावेत. त्यांचे चांगले दफ्तर ठेवावे. माझे काय, माझे आशीर्वाद आहेतच. पण खरे सांगू ? हे सगळे काम माझेच. मी करण्याचेच. पण पोराची उगाच नाराजी नको. ओझे आपणच उचलले, वडिलांनी त्याला केवळ हात लावला. एवढे समाधान त्यालाही मिळू दे ...

अरे, ही हरिकथा आहे. हे संकीर्तन आहे. अशी पर्वणी पुन्हा केव्हा येणार ? भक्तांच्या मनाला या कथेमुळे विश्रांति मिळत असेल तर ही पाणपोई घालायला नको कोण म्हणेल ?

"चाल, खुशाल चाल. घर लेखणी हातात. तुला काही सुद्धा कमी पडणार नाही. अगदी सगळे कसे तुझ्या मनासारखे होईल."

काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, बापुसाहेब जोग, बाळासाहेब देव, बापुसाहेब बुटी, दासगणू, तात्याबा, माधवराव, उपासनीबाबा – किती म्हणून नावे सांगावीत? प्रत्येक भक्तांच्या अंतःकरणाचे धागे बाबांच्या जीवनाशी नाजुकपणे गुंतलेले. प्रत्येकाचे काही ना काही गुपित केवळ एकट्या बाबांनाच माहीत असलेले. ते सर्वांचे एकमेव विश्रांतिस्थान आता नाहीसे झाले. आपल्यातील खरे पोरकेपण आता जाणवू लागले. जो तो मूकपणे आक्रोश करू लागला. दृष्टिआड झालेल्या बाबांना सांगू लागला. तात्याबा सारखा एखादा पोरका मुलगा म्हणू लागला–

"बाबा, माझी आई गेली तेव्हा तुम्ही म्हणाला : अरे, मामीचे शेवटचे दर्शन मला घ्यायचे आहे. तिला मशिदीवरून न्या रे.

मी पुत्र म्हणून सगळ्यात पुढे होतो. आईला शेवटचा निरोप देण्यासाठी सगळा गाव मागून नेत होता. माझा चेहरा दृष्टीस पडताच तुम्हांला भडभडून आले. द्वारकामाईच्या पायरीवर उभे राहून तुम्ही हंबरडा फोडावा तसे म्हणाला: अरे, माझ्या कोत्याची आई गेली रे! माझी मामी गेली रे!

आई गेली आणि कोत्या पोरका झाला, म्हणून का बाबा! या कोत्याचे मरण आपण घेऊन त्याचे प्राण तुम्ही वाचविले? माझ्या आईला दिलेले वचन पुरे केले ?

बाबा, मी तर तुमचा मुलगा, तुमच्या कडेखांद्यावर लहानाचा मोठा झालेला पण अशा कितीजणांना तुम्ही वाचविले! जीवदान दिले!

कोणाला आत्महत्येपासून वाचविले. कोणाला दारूपासून वाचविले. कोणाला सट्टा, जुगारापासून वाचविले. कोणाला अपमृत्यूपासून वाचविले.

कोणाला धन दिले. कोणाला विद्या दिली. कोणाला पुत्र दिला. कोणाला आरोग्य दिले. ज्याला ज्याला जे जे हवे होते ते ते तुम्ही त्याला दिले. त्याला आनंदी करून खरा कल्याणाचा मार्ग दाखवून या शिरडीतून बाहेर पाठविले."

दुसरी कोणी व्यक्ती तर अश्रू अनावर होऊन अश्रूंची भाषा बोलू लागली. म्हणू लागली ——

"बाबा, सर्व जगाने टाकलेला मी एक पोलिस माणूस. मला तुम्ही पोटाशी धरले.. म्हणाला : गणू! बाळ, तू माझी नोकरी कर.

विद्येचा गंधही नसलेला मी एक मंदमती द्विजपुत्र. पण तुमच्या वरदहस्तामुळे श्रीगुरुचरित्रातील करवीर क्षेत्रींच्या त्या मंदमती मुलाप्रमाणे मला

सर्व विद्या आपोआप प्राप्त झाल्या. कीर्तनकार, संतचरित्रकार म्हणून मी जगाच्या प्रेमादरास पात्र झालो. उपनिषदांच्या अर्थाची उकलही तुमच्या कृपेमुळे करू लागलो.

तुमचे शब्द अजूनही जसेच्या तसे स्मरतात. तुम्ही म्हणाला होता : त्या श्लोकाचा अर्थ मोठमोठ्या पंडितानाहि लागला नाही म्हणतोस ? म्हणून तो विचारण्यासाठी माझ्याकडे आलास ? अरे, एवढ्या साध्या गोष्टीसाठी मी कशाला पाहिजे ? पारल्यास जा. काका दीक्षिताची मोलकरीण तो अर्थ तुला सांगेल.

देवा, तो नटनाटकी, भक्तकैवारी, प्रेमळ सखा श्रीकृष्ण मी जेव्हा कीर्तनातील भक्तांसमोर उभा केला तेव्हा माझ्यासमोर दुसरे कोण होते ? कोण असत असे ? तुम्हीच ना ?

तो भगवान मानवदेहाने अंतर्धान पावला तेव्हा गोकुळवासीयांची जनांची स्थिती अशीच झाली असेल काय ? अशावेळी कोणाचे सांत्वन कोण करणार ? शोकाच्या या महापुरातून वहात जाण्याविना दुसरा मार्ग तरी कोणता ?"

टांगे, गाड्या, घोडी माणसे शिरडीच्या दिशेने मूकपणे वाहात होती. जणू गंगेवरून शिरडीकडे हिंदकळत चाललेल्या या शेकडो कावडी ! त्या आता समाधिस्थ बाबांच्या चरणी वाहिल्या की मने मोकळी झाली. हृदय शांत झाले. पवित्र झाले.

हळूहळू माणसे वाड्याशी आली. मुंग्याप्रमाणे रांगा करून बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊ लागली. समाधीच्या पायऱ्यांवर अश्रू मोकळे करून, थरथरत्या हातांनी समाधीला मिठी मारू लागली. म्हणू लागली, "बाबा तुम्ही निघून गेला. आता आमची दुःखे आम्ही कोणाकडे बोलू ? कोणाला सांगू ? या जगात आता आमचे कोण आहे ?

अश्रू, हुंदके, उसासे यांनी समाधी-मंदीर भरून गेले. जो तो आपल्या दुःखात चूर झाला. भोवतालचे जग विसरला.

एवढ्यात प्रत्येक अंतःकरणाचा पडदा बाजूस सारून आतून कोणी बाहेर आले. दिव्य वाणीने त्या प्रत्येक व्यक्तीशी जणू मनाच्या एकांतात बोलू लागले. म्हणाले ; 'मुलांनो ! मी गेलो असे तुम्हास वाटले ? मी कोठेही गेलो नाही. नित्य तुम्हांपाशीच आहे.

अरे, माणूस दृष्टिआड झाले म्हणजे कोठे गेले काय ? मी देह सोडला म्हणून कोठे गेलो काय ? माझी हाडेसुद्धा तुमच्याशी या समाधीतून बोलतील.

मी गेलो म्हणून हे स्थान ओसाड होईल असे तुम्हास वाटते ? छे: ! हा विचारही मनात आणू नका.

हजारोंनी माणसे येथे येतील. मुंग्यांसारखी माणसेच माणसे दिसतील. उत्सव, सोहाळे, सण येथे पूर्वीच्या शतपटीने साजरे करतील. सर्वत्र आनंदी आनंद भरून टाकतील.

जी माझी खरी प्रेमाची मुले लेंकर ती तर येथे येतीलच. पण जी येणार नाहीत, कोठे तरी भटकत राहातील त्यांनाही मी येथे ओढून आणीन. चिमणी-च्या पायाला दोरा घालून आणावे तसे !

अरे, तुम्हा बाळगोपाळांशिवाय मला येथे कसे चैन पडेल ? कसे करमेल बरे ?

आज या स्थानाचे महत्व विशेष नाही. पण एक दिवस असा उगवेल की येथे राजवाडे उभे राहतील. सुंदर फुलाफळांच्या बागा येथे होतील. कुबेराचे ऐश्वर्य या स्थानास लाभेल. प्रेमभक्तीच्या त्या वातावरणात सुख, शांती, विश्रांती यांची वाण कोणासही पडणार नाही.

मी तुम्हाला आश्वासन देतो, वचन देतो की ज्या कोणाचे पाय या माझ्या प्रिय शिरडीस लागतील त्याचे सर्व अपाय टळतील. जो कोणी माझ्या समाधीची पायरी चढेल त्याचे सर्व दुःख नाहीसे होईल.

ज्याचा भाव जसा, तसा मी त्याला पावेन. माझ्याविषयी मनी दृढभाव मात्र बाळगा.

अरे, तुमचा भार वाहाण्यासाठीच ना माझा अवतार ? मग मनात संशय का ? अनन्यभावाने मला शरण या की मी तुम्हापाशीच आहे. तुम्हास जे जे हवे ते ते देण्यास सिद्ध आहे.

मग आता डोळ्यात हे अश्रू का ? ते पुसा. आनंदी मनाने, शुद्ध भावाने मजकडे या. हे बाहू पसरून तुम्हांसाठीच मी येथे उभा आहे."

सच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईबाबामहाराज

● ● ●

श्रीसाईलीला

# लेखक - कवींचे द्वितीय स्नेहसंमेलन

## शिर्डी - १९७६

श्रीसाईलीलेच्या लेखक – कवींचे दुसरे स्नेहसंमेलन शिर्डी क्षेत्री दिनांक १५ व १६ फेब्रुवारी १९७६ ला भरविण्यात येत आहे. या निमित्याने श्रीसाईलीलेच्या लेखक-कवींना परस्पर परिचय होण्याची सुवर्णसंधि मिळणार असून यातूनच श्रीसाईलीलेच्या विकासाच्या दृष्टीने कार्य करण्यास अवसर मिळणार आहे.

या दोन दिवसाच्या स्नेहसंमेलनात श्रीबाबांचे दर्शन, मेळावा, परिचय कार्यक्रम, श्रीसाईलीलेत काय असावे, काय नसावे, श्रीसाईलीलेची आणखीन उत्तरोत्तर प्रगती कशी काय साधता येईल इ. विविध विषयांवर चर्चा असा भरगच्च कार्यक्रम आयोजिला जाईल.

श्रीसाईलीलेच्या लेखक-कवी यांची निवास-भोजनाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचेतर्फे करण्यात येणार आहे. तरी या संमेलनास हजर राहू इच्छिणाऱ्यांनी मे. रिसिव्हर साहेब, श्री साईबाबा संस्थान मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर, ता. कोपरगाव यांचेकडे त्वरित पत्रव्यवहार करून आपल्या आगमनाची सूचना त्यांना देऊन आपली जागा आरक्षित करावी म्हणजे व्यवस्था करणे ठीक पडेल.

● गतवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई सेंट्रल एस्. टी. मुख्य स्थानकावरून दुपारी १२ वाजता खास एस्. टी. गाडी सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी पन्नास जागा भरण्याची जरूरी आहे. यासाठी एस्. टी. भाडे आरक्षित जागेसह रुपये १६ प्रत्येकास द्यावे लागेल. श्रीसाईलीलेच्या लेखक-कवींना प्रथमाधिक्य दिले जाईल. म्हणून मुंबई-शिर्डी एस्. टी. बस मधील आपली जागा **२० जानेवारी १९७६** पर्यंत ताबडतोब नोंदवून आरक्षित करावी म्हणजे पुढील व्यवस्था करणे सोपे व सुलभ जाईल. एस्. टी. बस शनिवार दि. **१४** रोजी १२ वा. बॉम्बे सेंट्रल मुख्य आगार (सेंट्रल डेपो) येथून सुटेल व ती रात्री सुमारे नऊ वाजता शिर्डी येथे पोचेल. ही गाडी मुंबईहून, ठाणे, नासिक, सिन्नर कोपरगाव मार्गे शिर्डीस जाईल.

२० जानेवारी नंतर या स्नेहसंमेलनाचे शिर्डीच्या जागेच्या बाबतीत व एस. टी. मधील जागेच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार करणे केवळ अशक्य आहे.

**कार्यवाह :**

**डॉ. श्री. दि. परचुरे**

**श्री. सदानंद चेंदवणकर**

**निमंत्रक :**

**श्री. का. सी. पाठक**

# स्वप्नीं साईबाबा आले!

मध्यरात्रीला पौर्णिमेच्या नभ अवघे हसले
स्वप्नीं माझ्या साईबाबा आले, स्वप्नीं साईबाबा आले ॥धृ.॥

दिव्यभव्य अन् तेजोवलये
जटाधारी रूप, हदीं ठसलें
भावभक्तिनें मन माझें कणकण मोहरले
स्वप्नी साईबाबा आले, स्वप्नी साईबाबा आले ॥१॥

वाम करी झोळी, लोंबते अन्
खडावा गर्जती पायीं पावन
सुंदर ते ध्यान पाहुनी, भान माझे हरपले
स्वप्नी साईबाबा आले स्वप्नीं साईबाबा आले ॥२॥

हळूंच हसले, आणि वदलें
वत्सा तुझेंच रे होईल भले
दिव्यवाणी ती पडता कानी, सारें ब्रम्हांड खुलले
स्वप्नी साईबाबा आले, स्वप्नीं साईबाबा आले ॥३॥

साक्षात कृपेची मुर्ति दयाळू
अवघ्या भक्तांची, ती कनवाळू
जातीधर्म भेद न मानी, दर्शन मज दिधले
स्वप्नी साईबाबा आले, स्वप्नी साईबाबा आले ॥४॥

—विजय द. हजारे

## साधु संत येती घरा । तोंचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष 'रामावतारी' "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान सच्चिदानंद सद्गुरू, **श्रीसाईबाबा** ( शिर्डीचे ) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील " **सोनियाचा दिवस** " होय.

आजच श्रीसाईबाबांची पूर्णाकृती पंचधातुची, ( ब्रॉंझ ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा मग काय रोज पूजा, आरति, नैवेद्य म्हणजे जणू काय" **जाहले घराचे मंगल देऊळ** " !

आपण रोजच्या व्यवहारात आपल्या आवडीच्या अनेक गोष्टी खरेदी करतो. चैनीसाठी कळत न कळत अनेक पैसे खर्च करतो. नोकरी धंद्यात नफा कमावतो अगर तोटा खातो. पण त्याची खंत करीत बसत नाही. कारण देणारा परमेश्वर आहे, असे आपण समजतो. या मूर्तीची उंची ९ इंच व रुंदी ७ इंच आहे. आमची तर अशी पूर्ण खात्री आहे की प्रत्येक साईभक्ताला आम्हाला कोणताही आग्रह, अगर सक्ती करावी लागणार नाही. तो पूर्ण जाणकार आहे. कोणताही साई भक्त हा स्थिर व पूर्ण पणे खंबीर असतो व याची साईबाबांवरील श्रद्धा अढळ असते. असा आमचा विश्वास आहे. म्हणूनच अधिक सांगणे नलगे !

अधिक माहिती व पत्रकासाठी आजच लिहा :—

**श्री. मनोहर ध. पितळे**

पितळे वाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व)

मुंबई ४०० ०५७. टेलीफोन ५७ ६२ ९८




लेंडीबागेतील बाबांची योगसाधना. भविष्य काळातील गोष्टींचे ज्ञानही श्रीबाबांना असे.

फेब्रुवारी ६० पैसे १९७६

# अनुक्रमणिका — फेब्रुवारी १९७६


| | |
|---|---|
| १) संपादकीय | – स. न. वि. वि. |
| २) श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत. | – श्री. चंद्रकांत सामंत |
| ३) काय मौजेचा साईनाथ | – सौ. आशा धारप |
| ४) आमची शिरडीची सफर | – श्री. ना. वा. राऊत |
| ५) पारडशिंग्याची श्रीअनसूयामाता | – डॉ. श्री. अनील |
| ६) साईभक्त श्री. रघुनाथराव सांडभोर | – श्री साईनंद |
| ७) ठाण्याचे साईभक्त – श्री. द. शं. टिपणीस | – श्री. सदानंद चेंदवणकर |
| ८) एक वटवृक्ष उन्मळून पडला | – डॉ. शांताराम टिपणीस |
| ९) शिर्डी येथील दसरा उत्सव | – ❀ |
| १०) शिरडी–वृत्त माहे आक्टोबर १९७५ | – ❀ |
| ११) शिरडी वृत्त – माहे डिसेंबर १९७५ | – ❀ |
| १२) साईगीत, श्रीगजानन महाराज गीत | – श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| १३) कोण चालविल नाव | – श्री. श्री. तु. नाईक |
| १४) सर्व संग सोडूनी भाव | – श्री. नरेंद्रकृष्ण |
| १५) जय जय हे घनशाम | – श्री. गुणवंत तावरे |
| १६) साई धावत क्षणि येई. | – श्री. रा. श्री. पाटील गळेगावकर |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री साई वाक्सुधा

गुरू प्रत्यक्ष ईश्वर ।
ब्रह्मा विष्णू महेश्वर ।
गुरूचि वस्तुत: परमेश्वर ।
ब्रह्म परात्पर गुरूराया ॥ २० ॥

गुरू जननी गुरू पिता ।
गुरू त्राता देव कोपतां ।
गुरू कोपतां कोणी न त्राता ।
सदा सर्वदा जाणावें ॥ २१ ॥

गुरू दर्शक प्रवृत्तीचा ।
तीर्थव्रत निवृत्तीचा
धर्माधर्म विरक्तीचा ।
वेदश्रुतींचा प्रवक्ता ॥ २२ ॥

उघडूनि बुद्धीचे डोळे ।
संत दाविती निजरूप–सोहळे ।
पुरविती भक्ताचे डोहळे ।
अति कोवळे कारूणिक ॥ २३ ॥

तेणे विषय वासना मावळे ।
मिळे नाही ज्ञान चि वावळे ।
विवेक वैराग्य फळ आवळें ।
कृपाबळें हातीं ये ॥ २४ ॥
श्रीसाईसच्चरित्, अध्याय १८ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे ] फेब्रुवारी ७६ [ अंक १०



: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३६ ६१

# संपादकीय—

## स. न. वि. वि.

येत्या फेब्रुवारीच्या २३ तारखेस सोमवारी महाराष्ट्राचे महान संत समर्थ श्रीरामदास यांचा स्मृती दिन सर्वत्र साजरा केला जाईल. श्रीरामदासांनी मनाच्या श्लोकांच्या प्रसाराने कुमारापासून वृद्धांपर्यंत जीवनाचा उत्कृष्ट ठसा बिंबविलेला आहे.



संत समर्थ श्रीरामदास

संत रामदास हे आम्हा महाराष्ट्रीयांचे एक श्रेष्ठ दैवत आहे. औरंगाबाद जिल्हयातील जांब गावात रहाणाऱ्या श्री. सूर्याजीपंत ठोसर यांच्या घरी चैत्रशुद्ध नवमी म्हणजे रामनवमी शके १५३० (इ. सन १६०८) या दिवशी आनंद महोत्सव साजरा झाला. यादिवशी सूर्याजीपंतांची पत्नी सौ. रेणुका हिने एका परम दिव्य पुत्ररत्नाला जन्म दिला. ठोसर घराण्यात चांगली एकवीस पिढ्या रामोपासना चालत आलेली होती. याशिवाय सूर्याजींनी सूर्याची विशेष उपासना केली. या सर्व पुण्याईचे फळ म्हणजेच त्यांच्या घरात जन्मलेला तो सुपुत्र होय. आईने त्याचे नाव नारायण असे ठेवले. हे नारायण म्हणजेच आपले समर्थ रामदास होत. रामनवमीला त्यांचा जन्म झाला म्हणून त्यांना रामाचाच अवतार समजू लागले. लहानपणी रामदासांनी उत्तम शरीरसंपत्ती कमावली. वयाच्या सातव्या वर्षी त्यांची मुंज झाली व त्यानंतर काही दिवसातच त्यांचे वडील निवर्तले. त्यांचे वडील बंधू गंगाधरपंत यांनी त्यांचे शिक्षण केले. समर्थांनी संहिता, अष्टाध्यायी, ब्रम्हकर्म, ज्योतिष व हिशोब यांचा विशेष अभ्यास केला. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी समर्थांनी हनुमानाच्या देवळात घोर तपश्चर्या केली. तेव्हा त्यांच्यावर मारुतीने श्रीरामचंद्राकडून अनुग्रह करविला. यानंतर मात्र नारायण या नावाऐवजी समर्थांचे रामदास हेच नाव कायमचे रूढ झाले. ते आपल्या मनःपूर्वक भक्तीने रामाचे दास बनले व अखेरीस श्रीराम त्यांचा दास बनला.

बाराव्या वर्षी त्यांचे विवाह करण्याचे ठरले. याप्रसंगी ब्राम्हणांनी "शुभ-मंगल सावधान" मंगलाष्टकात म्हणताच, समर्थ म्हणजे नारायणराव ठोसर लग्नाच्या मांडवातून पळून गेले, आणि अठरा दिवस पायी प्रवास करून पंचवटीला श्रीदर्शन घेऊन नाशिक जवळील टाकळी येथे पोचले. तिथे त्यांनी बारा वर्षे घोर तपश्चर्या केली. श्रीराम जयराम जयजयराम या तेरा अक्षरी मंत्राचा तेराकोटी जप त्यांनी केला. याच सुमारास त्यांनी दासबोध, करुणाष्टके हे ग्रंथ लिहिले. यानंतर सबंध भारताची बारा वर्षे त्यांनी यात्रा केली. काबूल, कंदाहार येथेही ते जाऊन आले. तीर्थाटन पुरे झाल्यावर प्रभू रामचंद्रांच्या आज्ञेप्रमाणे ते शके १५६६ (इ. स. १६४४) साली कृष्णातीरी आल्यावर पुढे ३६ वर्षे त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. ग्रंथराज दासबोध, मनाचे श्लोक, आत्माराम हे मुख्य ग्रंथ असून अभंग करुणाष्टके, पदे, आरत्या, सगुणनिर्गुण ध्याने, सवाया, मानस-पूजा मानपंचके, अंतर्भाव, ललिते इ. स्वतंत्र रचना अन् रामायणाच्या किष्किंधाकांड, सुंदरकांड आणि युद्धकांडाचा श्लोकबद्ध मराठी तर्जुमा त्यांनी केला आहे. समर्थांची शिष्यपरंपरा अफाट असून शिष्यांतील अग्रगण्य म्हणजे डोमगाव मठाधिश कल्याणस्वामी व शिरगाव मठाधिपती श्रीदत्तात्रेयस्वामी या द्विजस्वहस्तलिखित श्रीदासबोधाच्या प्रती उपलब्ध असून श्रीदासबोधाच्या तेराव्या दशकाचा सहावा समास म्हणजे श्रीसमर्थांनी शिवाजी राजांवर जेव्हा अनुग्रह केला त्यावेळी केलेला लघुबोध होय. श्रीदासबोध मूळ-२१ समासांचा, नंतर त्याचे ७ दशक (७० समास) झाल्यानंतर त्यात आणखी एका दशकाची भर पडल्याने त्यांचा समन्वय पहिल्या ८ दशकात निर्माण झाला. पण पुढे समर्थांनी वेळोवेळी दिलेली प्रवचने, पुढील बारा दशकात एकत्रित करून वीस दशकांचा आणि दोनशे समासांच्या संग्रहाचा दासबोध पूर्ण झाल्याने दासबोधाचे २०० समास म्हणजे श्रीसमर्थांची २०० स्वतंत्र प्रवचने आहेत. श्रींनी ५० ओव्यांचे अल्पसे योगानुभव प्रकरण श्रीकल्याण-स्वामीसाठी तयार करून त्यात शेवटी 'इति दासबोध ग्रंथ। त्यातील हा सोलीव अर्थ श्रोते ऐकता यथार्थ। समाधिस्थ होती!' असा उल्लेख आहे. मराठी भाषेच्या चतुर्वेदग्रंथांपैकी दासबोध हा एक सुरस ग्रंथ आहे. श्रींची जन्मभूमि, जांब तपोभूमी टाकळी अन् कर्मभूमि सारा भरतवर्ष ठरला. श्री कधी चाफळ येथे, सातार्‍याजवळील सज्जनगडावर तर कधी शिवथरचे घळीत निवास करीत. महाराष्ट्रात बलोपासना व्हावी म्हणून सुमारे अकरा महारुद्रांची स्थापना करणार्‍या या थोर संताने, महात्म्याने, श्रीरामसेवेत, महाराष्ट्रीय जनतोद्धार कार्यात, अन् परोपकारात देह झिजवून अखेर वयाच्या ७३ व्या वर्षी माघ. व. ९ शके १६०३ (इ. स. १६८१) रोजी सज्जनगडावर देह ठेवला. 'आत्माराम' दासबोध माझे स्वरूप स्वतःसिद्ध।" हे त्यांचे अंतिम उद्गार. श्री. दासबोध ही त्यांची वाङ्मयीन मूर्ती आहे.

श्री साईभक्तांची श्रद्धास्थाने—१७

# श्री साईबाबा सत्संग मंडळ, सुरत

• श्री. चंद्रकांत सामंत

"महान कार्याची बीजे लहान घटनात असतात" ह्या अर्थाची एक म्हण इंग्रजीत प्रचलित आहे. बऱ्याच प्रसिद्ध व्यक्ति वा संस्थांचा कार्यारंभ अतिशय हळुवारपणे व गाजावाजा न करता होतो पण नंतरची त्यांची प्रगति फार झपाट्याने होते, असा आपला दैनंदिन जीवनातील अनुभव आहे.

गुजराथ राज्यातील सुरत ह्या शहरात १९५५ साली जुलै महिन्याच्या अठ्ठावीस तारखेस श्री. ठाकोरभाई पानवाला ह्या एका प्रसिद्ध उदयोगपतींच्या पुढाकाराने एक भजन मंडळ अस्तित्वात आले. "श्रीसाईबाबा सत्संग मंडळ" ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ह्या मंडळाचे उद्दिष्ट सुरवातीला फक्त भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यापुरतेच होते. कालांतराने ह्या भजन मंडळाचे रूपांतर श्रीसाईबाबांच्या मंदिरात होऊन आज त्या एकेकाळच्या छोट्याश्या रोपट्याला एका विशाल वृक्षाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

सुमारे पाच लाख वस्ती असलेल्या सुरत ह्या शहराच्या एका गजबजलेल्या व्यापारी पेठेत – चौटा बाजार, नानी हिंग पोळ येथे – एका अरुंद गल्लीत हे मंदिर वसलेले आहे. मंडळाची वास्तू पाच मजल्यांची आहे. इमारतीत प्रवेश करताच समोर श्रीबाबांचा साडेचार फुटाचा पुतळा दृष्टिस पडतो. त्याची स्थापना २८ एप्रिल १९६१ रोजी झाली. त्यापूर्वी त्या जागेत फक्त श्री बाबांची एक मोठी तसबीर ठेवलेली होती. पुतळ्याच्या उजव्याहाताला श्रीदत्तात्रेयाचा एक पुतळा आहे, व त्याच्यापलीकडे कोपऱ्यात श्रीबाबांची धूनी-माई आहे. १९६२ साली रामनवमीच्या सुमुहूर्तावर पाच अग्निहोत्री ब्राम्हणांनी केवळ मंत्रोच्चाराच्या सामर्थ्यावर ही धुनी प्रज्वलित केली व ती आजतागायत पेटत आहे. ह्या धुनीतील उदीचा प्रभावही कित्येकांना वेळोवेळी आला आहे. उजव्या हाताला असलेल्या एका मोकळ्या दालनात निरनिराळ्या उत्सव-प्रसंगी, पौराणिक कथांवर आधारित अशा यथोचित प्रसंगांची सजावट करण्यात येते व त्यासाठी एक कायमचा रंगमंच तयार करण्यात आला आहे. ह्या रंग-मंचाच्या बरोबर खाली एक प्रशस्त तळघर बांधण्यात आले आहे व तेथे श्रीसाईनाथांचा सव्वापाच फूट उंचीचा पुतळा २० नोव्हेंबर १९७४ रोजी स्थापन करण्यात आला आहे. पुतळ्याच्या पायाशी शिरडी येथील मंदिरातील समाधिची एक छोटीशी पण मनोहर प्रतिकृति तयार करण्यात आली आहे.

श्रीबाबांच्या पुतळ्याच्या उजव्या हाताला गुजराथचे एक संत जलारामबाप्पा, पारश्यांचे दैवत झरतुष्ट्र व स्वामी विवेकानंद ह्यांच्या मूर्ति तर डाव्या हाताला श्रीरंगावधुत महाराज, गौतमबुद्ध व महावीर ह्यांच्यामूर्ति कांचेच्या शोकेसेसमध्ये बसविलेल्या आहेत. ध्यानासाठी व चिंतनासाठी आवश्यक ती वातावरण निर्मिती ह्या तळघरात निश्चितपणे उपलब्ध होऊ शकते. तळघरात प्रवेश करण्यासाठी तळमजल्याच्या दोन्ही अंगांनी पायऱ्यांची योजना केलेली आहे.

पहिल्या मजल्यावर जाण्याच्या जिन्यावर कठड्यालगतच तसेच वरही सर्वत्र भिंतीवर श्रीसाईसच्चरित्रातल्या ठळक घटनांची काचेवर काढलेल्या पेंटिंग्जद्वारे नोंद केलेली आहे. अशी एकंदर ३८ चित्रे दक्षिण गुजरातेतील एक सुप्रसिद्ध चित्रकार मोतिसिंह चावडा ह्यांनी काढलेली आहेत. ह्याच मजल्यावरील प्रमुख व अत्यंत आगळे असें आकर्षण म्हणजे श्रीबाबांचे "शयनगृह" अर्थात् आरसेमहाल. हजारो रुपये खर्चून तयार करण्यात आलेले हे शयनगृह म्हणजे कांचेवरील कलाकौशल्याचा एक अप्रतिम नमुनाच आहे, आणि त्याची भव्यता व यथार्थता पटण्यासाठी हे शयनगृह प्रत्यक्षच पाहिले पाहिजे. निरनिराळ्या लहानमोठ्या रंगीबेरंगी काचाच्या तुकड्यांनी ह्या शयनगृहाच्या भिंती, तक्तपोशी व पायाखालची जमीन नुरुद्दीन नावाच्या मुसलमान कलाकाराने मोठ्या परिश्रमपूर्वक व कौशल्याने बनविलेली आहे. एका सहा फूट लांबीच्या पलंगावर श्रीसाईनाथ उजवा हात डोक्याखाली उशीसारखा घेऊन पहुडलेले आहेत. त्यांच्या डोक्याच्या वरल्या बाजूस शेषाचा फणा उभारलेला दिसतो. निद्रितावस्थेतल्या ह्या पुतळ्याची घडण गंगेच्या काठावरील खास माती आणून श्री. निवारण पाल ह्या बंगाली मूर्तिकाराने केली आहे.

दुसऱ्या मजल्यावर मंडळाचे स्टोअरहाऊस, तर तिसऱ्या मजल्यावर प्रवचने, कीर्तने अशा कार्यक्रमांसाठी एक सभागृह बांधण्यात आले आहे. त्याच्या वरच्या मजल्यावर दुरुन येणाऱ्या संतादिकांच्या वास्तव्यासाठी राहण्या उतरण्याची सोय केली आहे.

दरवर्षी मंदिरात मकरसंक्रांत, महाशिवरात्र, रामनवमी, गुरु पौणिमा, गोकुळाष्टमी गणेशोत्सव, दसरा, दिवाळी, दत्तजयंती आदि सण समारंभपूर्वक साजरे केले जातात. उत्सवप्रसंगी कीर्तने, भजने ह्या कार्यक्रमाशिवाय साधुसंत, गरीब तसेच अनाथ व्यक्तिनां अन्न दिले जाते. मंदिराच्या दैनंदिन कार्यक्रमात श्रीबाबांना स्नान, तीनवेळा आरती व गुरुवारी रात्री भजन व शेजारती ह्या गोष्टींचा समावेश होतो. ही कार्ये सर्वजण विशेषतः कॉलेजविद्यार्थी स्वेच्छेने व विनामूल्य करतात. मंदिरात पगारी नोकर नाहींत. श्रीबाबांच्या पुतळ्यांना हार, फुले व नैवेद्य अर्पण करण्यास सर्वांना पूर्ण मुभा आहे.

श्रीसाईबाबा सत्संग मंडळाचे उद्दिष्ट गेल्या कित्येक वर्षांपासून व्यापक करण्यात आले असून श्री बाबांना प्रिय अशा समाज कल्याणाच्या कित्येक गोष्टीं मंडळाने हाती घेतल्या आहेत. तापी नदीला १९५९, १९६८ व १९७० ह्या साली आलेल्या पुराचे प्रसंगी मंडळाने कित्येक दिवस पूरग्रस्तांच्या मदतीसाठी अन्नसत्र चालविले होते. त्याचप्रमाणे दोन एक वर्षापूर्वी सुरत व बलसाड जिल्ह्यात दुष्काळ पडला असता मंडळाने तातडीने धान्य, कपडे, व भांडी दुष्काळग्रस्तांना उपलब्ध करून दिली. मुलांवर चांगले संस्कार व्हावेत ह्या हेतूने मंडळातर्फे 'शिशु मंदिर' चालविले जाते, व तेथे त्यांना प्राथमिक इयत्ते-पर्यंतचे शिक्षण विनामूल्य दिले जाते. गरीब व गरजु विद्यार्थ्यांना पुस्तके, औषधपाणी, जेवण वगैरेंचीही सोय केली जाते. हिवाळ्यात मंडळातर्फे गरीबांना घोंगड्यांचे वाटप होते. नुकताच सुरत येथे 'महावीर हेल्थ कँप' व 'पुनित सेवा समाज' ह्यांच्या सहकार्याने मंडळाने एक नेत्रयज्ञ आयोजित केला होता. ह्या यज्ञात जवळ जवळ साडेतीन हजार नेत्ररोग्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली व सुमारे ८५० जणांच्या डोळ्यांवर विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात आली. गणेशपुरी, वज्रेश्वरी, येथे जाणाऱ्या असंख्य भक्तांच्या सोयी-साठी मंडळाने ३५००० रुपये खर्चून 'श्रीसाई कुटीर' बांधून ते श्रीगुरुदेव आश्रमाच्या हवाली केले आहे. शिरडी येथेसुद्धा भक्तांसाठी एक विश्रामधाम बांधण्यात येणार असून त्या दृष्टीने मंडळाचे प्रयत्न चालू आहेत.

मंडळाच्या कार्याचे महत्व लक्षात घेऊन, एक चौदाजणांचे मंडळ श्री. ठाकोरभाई पानवाला ह्यांच्या नेतृत्वाखाली रात्रंदिवस कार्यरत असते. भक्त मंडळींकडून स्वयंस्फूर्त मिळणाऱ्या देणग्यांमधून मंडळाची कार्ये पार पडत असतात. सुरत व आसपासच्या भागांखेरीज सुमारे १२०० वर्गणीदार परदेशातून देणगी-रूपाने नियमित मदत पाठवित असतात. श्री. वखाडीया, गेब्बर ह्यांच्यासारख्या उत्साही व तरुण कार्यकर्त्यांना हाताशीं धरून श्री. ठाकोरभाई मंडळाच्या कार्याचे स्वरूप अधिकाधिक जनसेवाभिमुख करण्याच्या योजना आखीत आहेत. श्रीसाईनाथांच्या कृपाशिर्वादाने त्या योजना फलद्रुप होतील ह्यांत काय संशय ?

* मार्च १९७६ अंकात गाठीभेटी या सदरात

**विख्यात संगीत दिग्दर्शक श्री दत्ता कोरगावकर**

**लेखक : श्री. चंद्रकांत सामंत**

# काय मौजेचा साईनाथ

● सौ. आशा किशोर धारप

श्री साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांची ओळख होऊन जवळ जवळ ७–८ महिने झाले. श्री. साईलीला मासिकाकरता लिखाण करावे असा प्रेमळ आग्रह त्यांनी अनेकदा केला. पण निव्वळ आळसामुळे हे काम पुढे ढकललं जात होत. परंतु १–१॥ महिन्यापूर्वी एक घटना घडली आणि तेव्हापासून आजपर्यंत हातात पेन धरेपर्यंत चैन पडत नव्हत.

आजकाल संतोषीमातेची भक्ती समाजात वाढत्या प्रमाणात दिसून येते. अनेकजण सोळा शुक्रवारच व्रत करून शुक्रवारी आंबट वस्तू खाणं वर्ज्य करतात. मीही हे शुक्रवार करून पाहू या असा विचार केला व त्याप्रमाणे सुरवातही केली. एक दिवस आंबट वस्तू वर्ज्य करण्यामागे काही अंशी शारीरिक शुद्धीचा हेतू असावा असा विचार करून तत्वत: मी शुक्रवारी आंबट खाणं सोडल. परंतु हा नियम स्वत:पुरताच मर्यादित ठेवला. महत्त्वाचं म्हणजे आंबट विचार, आंबट उच्चार आणि आंबट आचार न करण्याचा संकल्प केला. या दिवसातच एका श्रावण शुक्रवारी जिवतीमातेच्या सवाष्णी माझ्याकडे जेवत असता, आमच्या कॉलनीतला एक मुलगा बेल वाजवून आला. त्याने आणली होती शिरडीहून आणलेल्या बाबांच्या प्रसादाची पुडी व उदी. त्यावेळी मला काय वाटल असेल हे साईभक्त जाणू शकतात. यानंतरची दुसरी १–१॥ महिन्यापूर्वीची घटना म्हणजे साईप्रसादाचा कळस आहे. दसऱ्याच्या आधीची गोष्ट एका गुरुवारी रात्री व शुक्रवारी पहाटे मला स्वप्न पडल. श्रीसाईबाबा स्वप्नात दिसले. जिवंत स्वरुपात त्यांनी स्वत: मला उदी लावली. पण हा जो बाबांचा चेहरा होता तो नेहमीपेक्षा वेगळा होता. सकाळी अत्यानंदात जागी होऊन घरातील सर्वांना स्वप्न सांगितलं. बाबांचा कृपाप्रसाद मिळाला या आनंदात दुपारपर्यंतचा वेळ कसा गेला तो कळलाही नाही. दुपारी बेल वाजली व पोस्टमनने साईलीला मासिकाचा अंक हातात दिला. आनंदातिशयानं कपाळी बाबांचा अंक लावून उघडला आणि मुखपृष्ठावर बघते तो, बाबांचा स्वप्नात निराळा असा दिसलेला चेहरा. यावेळच्या माझ्या मन:स्थितीची कल्पना श्रीसाईभक्तांवरच सोडलेली उत्तम. अशा तऱ्हेनं श्रीसाईचरणी नमस्कार आधीपासून घडत असता आता चमत्कारही घडले आहेत.

●